Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

०१/२०२२

**विषय - विद्यापीठ अधिविभाग व संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था मधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेणेबाबत तसेच विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था यामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या दैनंदीन उपस्थितीबाबत..**

**संदर्भ-** १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३ दि.७ जानेवारी, २०२२

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिविभाग व संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था मधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेणेबाबत, परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेणेबाबत तसेच, विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था यामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या दैनंदीन उपस्थितीबाबत उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार सोबत प्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ अधिविभाग व संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था यामधील **वर्ग** प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दि. १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत फक्त **ऑनलाईन** पध्दतीने सुरू ठेवण्यात यावेत. विद्यापीठ अधिविभाग व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी **ऑनलाईन (Online)** अध्यापन व अध्ययन सुरू ठेवावे.

२. उपरोक्त संदर्भीय क्र. १ च्या शासन परिपत्रकानुसार विद्यापीठ अधिविभाग व संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था मधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती **५०%** करण्यात येत आहे. याप्रमाणे संबधित अधिविभाग प्रमुख, प्राचार्य/संचालक, व विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी चक्राकार **(Rotation)** पध्दतीने संबधितांच्या उपस्थितीबाबत व वर्क फ्रॉम होम बाबत नियोजन करावे. यानुसार, जे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित न राहता **Work from Home** करतील त्याबाबतचा अनुपालन अहवाल संबधित प्राचार्य/ संचालक, अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुख यांचेकडे सादर करावा.

३. सर्व संबधितांनी उपरोक्त शासन परिपत्रकामधील इतर सुचनानुसार कार्यवाही करावी.

४. अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या विभागांची (अभियांत्रिकी विभागाअंतर्गत येणारे सर्व विभाग, उद्यान विभाग, आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, वाहन विभाग, परीक्षा इ.) सेवा व्यवस्थितरित्या सुरू राहील याची योग्य ती दक्षता संबधित विभागप्रमुख यांनी घ्यावी व त्याप्रमाणे नियोजन करावे.

५. सोबतच्या च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे दि.१५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत लागू राहतील, तसेच, दरम्यान शासन/जिल्हा प्रशासन याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेप्रमाणे पुढील निर्देश देण्यात येतील.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
प्र. कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/६६**
**दि. ०७/०१/२०२२**

**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संचालक, विद्यार्थी विकास विभाग, चिफ रेक्टर व रेक्टर, सर्व वसतिगृहे
५) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दि. ७ जानेवारी, २०२२.**

वाचा:- उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ०६/विशि-३, दि. १३ ऑक्टोबर, २०२१.

प्रस्तावना :-

शासन परिपत्रक दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अन्वये नियमित वर्ग सुरु करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, कोव्हिड-१९ च्या संभावित तिसऱ्या लाटेमुळे राज्यामध्ये बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे बाधित रुग्णांची संख्यासुध्दा मोठ्या प्रमाणावर दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाने दि. २४/१२/२०२१ व ३०/१२/२०२१ च्या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणांवर वावरण्यास प्रतिबंध लावले आहेत. या पार्श्वभूमीवर दि. ०४ जानेवारी, २०२२ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे झालेल्या बैठकीमध्ये सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, अतिरिक्त आयुक्त-मुंबई महानगरपालिका यांच्यासमवेत विद्यापीठे व महाविद्यालयातील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेणे, त्याचप्रमाणे वसतीगृहे/लसीकरणासंदर्भात चर्चा झाली. वेगाने वाढत असलेल्या कोव्हिड-१९ व ओमायक्रॉनच्या रुग्णांची संख्या पाहता समुहसंसर्गाचा धोका टाळण्यासाठी व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयातील वर्ग तसेच इतर बाबींसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

शासन परिपत्रक, दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अधिक्रमित करण्यात येत असून उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील **वर्ग** प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दि. १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्यात यावेत.
२) सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील **परीक्षा** ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावी.

विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टीविटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोरोना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परीक्षा देऊ शकला नाही तर अशा विद्यार्थ्याची ऑनलाईन पध्दतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित काही भागात तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यापीठाशी व नांदेड विद्यापीठाशी संलग्नित काही भागात नेटवर्कींग सेवा विस्कळीत असल्यास किंवा उपलब्ध नसल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन ऑफलाईन स्वरुपात या भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात याव्यात.

३) परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे/महाविद्यालयांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हेल्पलाईन नंबर इ. स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४) सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालयांशी निगडित वसतीगृहात राहत असलेल्या विद्यार्थ्यांना पुर्वसूचना व कालावधी देऊन ही वसतीगृहे बंद करण्यात यावीत. फक्त परदेशी विद्यार्थी, प्रयोगशाळांमध्ये संशोधन करीत असलेले विद्यार्थी तसेच पीएचडीचे विद्यार्थी यांना वसतीगृहात राहण्याची परवानगी देण्यात यावी. केंद्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था जसे-आयआयटी, आयआयएम इ. येथील वसतीगृहांबाबतचा निर्णय त्या त्या ठिकाणची परिस्थिती पाहून संबंधित संस्थांच्या संचालकांनी घ्यावा. या विद्यार्थ्यांना संसर्ग होणार नाही याबाबत विद्यापीठ व महाविद्यालय प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. स्थानिक प्राधिकरणांना कोविड केअर सेंटर म्हणून वसतीगृहांची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात यावीत.

५) विद्यापीठे तसेच महाविद्यालयांनी अद्याप लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना देऊन लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून तातडीने लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.

६) तंत्रनिकेतनामधील विद्यार्थी १५ ते १८ या वयोगटातील असल्याने व या वयोगटातील व्यक्तींचे लसीकरण सुरु झाले असल्याने संचालक (तंत्र शिक्षण) यांनी लसीकरण करावयाच्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना उपलब्ध करुन द्यावी व विशेष मोहिमेद्वारे लसीकरण पूर्ण करण्यात यावे.

७) संचालक (कला) यांनी कला विषयाबाबतच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यासाठी परीक्षेचे / प्रश्नपत्रिकेचे स्वरुप निश्चित करावे.

८) ज्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांचा तपशिल संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना उपलब्ध करुन देऊन व संबंधित प्राधिकरणांशी संपर्क साधुन विशेष मोहिम राबवून लसीकरण पूर्ण करुन घेण्यात यावे.

९) सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकीय / शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती ५०% करण्यात येऊन चक्राकार पध्दतीने त्यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत व वर्क फ्रॉम होम बाबत विद्यापीठाने नियोजन करावे.

१०) १५ फेब्रुवारी, २०२२ नंतर परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्देश देण्यात येतील.

सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०१०७१७३४५३०२०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO
BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2022.01.07 17:37:37 +05'30'

**(अजित म. बाविस्कर)**
**उप सचिव**

**प्रत –**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
४. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व महानगरपालिका आयुक्त.
७. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे.
८. कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे.
९. कुलगुरू, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०.जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
११.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
१२.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
१३.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१४.मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१५.मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१६.निवड नस्ती.